**शपथेवर उलटतपास पुढे सुरु–**

१५. महादेव वासुदेव परब हे वयाच्या ८१–८२ व्या वर्षी मरण पावले. हे म्हणणे खरे आहे की, महादेव परब यांच्या जन्म सन १९४४ साली झाला होता. दप्तरी माझे वतीने दाखल करण्यात आलेले दस्त मी वाचले होते. नि.क्र.१५४ व १५५ या दस्तांची नक्कल मिळवली त्यावेळी मी वाचले होते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१५४ वरील फेरफार मी दि.१३/०५/२०१३ रोजी मिळवला होता. प्रतिवादी क्र.०१ यांची लेखी कैफियत मी वाचली आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.०१ यांची लेखी कैफियतीमध्ये असे म्हणणे आहे की, गिरीजाबाई यांनी दावा मिळकत त्यांना बक्षिस पत्राने दिली आहे. प्रस्तूत दाव्याव्यतिरीक्त मी वादांकित बक्षिसपत्र इतर कोठेही आव्हानित केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादपत्रात बक्षिस पत्राचा उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या ज्या हिश्श्यामध्ये जुनी सागाची झाडे होते त्याच मिळकतीमध्ये गिरीजाबाई यांचे जुने घर होते परंतू सध्या ते घर कोसळले आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या मिळकतीमध्ये जुने घर होते त्या मिळकतीस टेंबली नावाने संबोधले जाते व सदर मिळकतीचे क्षेत्रफळ हे एकूण ३६ गुंठे होते. हे म्हणणे खरे नाही की, गिरीजाबाई यांनी त्यांच्या हयातीत सदर क्षेत्रामध्ये सागाच्या झाडांची लागवड केली होती. माझ्या म्हणण्यानुसार, सदर सागाच्या झाडांची कापणी केली त्यावेळी त्यांचे वय अंदाजे ५० ते ६० वर्षे असावे. हे म्हणणे खरे आहे की, गिरीजाबाई या दस्तांवर अंगठ्याचे निशाण लावत होत्या. प्रतिवादी क्र.०१ यांनी दप्तरी दाखल केलेल्या पावत्या मी पाहिलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.०१ जयवंत हे वेळोवेळी

गिरीजाबाई यांना आर्थिक मदत करत होते म्हणून व प्रेमापोटी गिरीजाबाई यांनी वादांकित बक्षिसपत्र प्रतिवादी क्र.०१ यांच्या हक्कात नोंदवून दिले.

१६. फेरफार क्र.१३०६ च्या अनुषंगाने सर्वांना नोटीस जारी करण्यात आल्या होत्या. मयत सुलोचना यांच्याशी माझे संबंध चांगले होते. तसेच, सुलोचना यांच्या निधनानंतर त्यांच्या वारसांशी देखील माझे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मयत सुलोचना तसेच त्यांच्या वारसांनी मला वादांकित बक्षिसपत्राची माहिती दिली होती.

१७. हे म्हणणे खरे आहे की, माझी पत्नी मुस्लीम आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पत्नीच्या माहेरच्या लोकांच्या दबावाखाली मुस्लीम धर्म स्वीकारला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गिरीजाबाई यांचा दावा मिळकतीतील हिस्सा प्रतिवादी क्र.०१ यांना वादांकित बक्षिसपत्रान्वये मिळाला आहे. दावा दाखल करण्यापूर्वी फेरफार उतार–यावरुन मला वादांकित बक्षिसपत्राची माहिती मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की, बक्षिसपत्राच्या आधारे प्रतिवादी क्र.०१ च्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या महसूल दप्तरी कायदेशीररीत्या नोंदवण्यात आली आहे. हे म्हणणे खरे नाही की, २०१६ साली प्रतिवादी क्र.०१ यांनी माझ्या संमत्तीशिवाय झाडे तोडल्याचे मी खोटे सांगत आहे.हे म्हणणे खरे नाही की, गिरीजाबाई यांच्या निधनानंतर दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.०१ यांचा कब्जा होता व आजही आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.०१

यांना दि.१३/०४/२०१६ रोजी विधिज्ञांमार्फत खोटी नोटीस पाठवली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वन अधिका–यांकडे खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, वादपत्रात व माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात मी मिळकतीमध्ये माझा चुकीचा हिस्सा नमूद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुलोचना व लिलावती यांचा जन्म सन १९५६ पुर्वी झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.०१ यांचे शिक्षण हडपीड येथे झाले होते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, सदर गावात त्याचे शिक्षण चौथीपर्यंत झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.०१ वगळता इतर प्रतिवादी किंवा माझी आई व मावशी यांनी गिरीजीबाई यांचे पालनपोषणाकडे लक्ष दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.०१ हे शासकीय सेवेत होते. हे म्हणणे खरे नाही की, वादांकित बक्षिसपत्र मला मान्य असल्याने मी ते आजपावेतो कोठेही आव्हानित केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल करुन खोट्या मजकुराचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

प्रतिवादी क्र.०२ चे वारसांनी व प्रतिवादी क्र.०५ ते ११ यांनी दावा मान्य केला असल्याने त्यांच्यावतीने उलटतपास नाकारला. प्रतिवादी क्र.०३, ०४ यांच्यातर्फे दावा एकतर्फा असल्याने त्यांचेतर्फे साक्षीदाराचा उलटतपास नाही.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2022.08.04 11:17:38 +0530

दि.०३/०८/२०२२.

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड